// प्रकरण - सहावे //

## // संकलीत माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन //

६.१ प्रास्ताविक.

६.२ प्रश्नावलीच्याद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन.

६.३ १] प्रशिक्षणार्थींच्या संकलित माहितीचे विशदीकरण.

२] प्राचार्यांच्या संकलित माहितीचे विशदीकरण.

३] प्राध्यापकांच्या संकलित माहितीचे विशदीकरण.

६.४ मुलाखती द्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन.

// प्रकरण - ६ वे //

## // संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन //

### ६.१ ** प्रास्ताविक :-

मागील प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधन प्रकल्पासाठी वापरलेली सर्वेक्षण संशोधन पध्दती होय. या संशोधन पध्दतीच्या आधारे माहिती गोळा करण्यासाठी वापरलेली संशोधनाची साधने प्रश्नावली, मुलाखती, निरीक्षण, प्रत्य भेटीद्वारे माहिती मिळविली आहे. त्यातून प्रश्नावलीचे स्वरुप, मुलाखतीची पध्दती नमुना - निवड पध्दती व संशोधनाच्या माहितीचा उद्गम या विषयी माहिती दिलेली आहे.

सदरील प्रकरणामध्ये विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील ८० प्रशिक्षणार्थी की, जे विनाअनुदानित अध्यापक विद्यालयात प्रथम आणि द्वीतीय वर्षात प्रशिक्षण घेत आहेत त्यांना अभ्यासकाने प्रश्नावल्या दिलेल्या होत्या. त्यापैकी त्यांच्याकडून ७७ प्रश्नावल्या भरुन मिळालेल्या आहेत. प्रश्नावल्या भरुन मिळालेल्या आहेत म्हणजे शेकडा ९६.२५% प्रश्नावल्या भरुन आल्या. प्रश्नावल्या भरुन मिळालेल्या संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केलेले आहे.

प्राचिन काळापासूनच शिक्षक प्रशिक्षणाची सुरुवात केली आहे. काळ जस जसा बदलत गेला तस तसे शिक्षक प्रशिक्षणात वेळोवेळी बदल होत आहे. महाराष्ट्र राज्यातील जिल्हा परिषद शाळा आणि

प्राचिन काळापासूनच शिक्षक प्रशिक्षणाची सुरुवात केली आहे. खाजगी संस्थानच्या शाळांना प्रशिक्षीत शिक्षक मिळावेत म्हणून शासनाने राज्यात शासकीय अध्यापक विद्यालये सुरु केली आहेत. तसेच कांही संस्थांच्या अध्यापक विद्यालयांनापण अनुदान देत आहेत. अलीकडील काळात जवळ जवळ प्रत्येक तालुक्याला आणि मोठ्या गावात विनाअनुदान मान्यता दिली आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात विनाअनुदान तत्वावर चालणारी शासनमान्य चार अध्यापक विद्यालये आहेत. या अध्यापक विद्यालयात प्रशिक्षणार्थी अध्यापकांना मिळणाऱ्या शिक्षणाचा दर्जा, प्रशासकीय समस्या, भौतिक सुविधा, मनुष्यबळ यांच्या अभ्यासासाठी विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांचा अभ्यास प्रत्यक्ष भेटी, मुलाखती, चर्चा प्रश्नावलीतून मिळविलेली माहिती याद्वारे अभ्यासकाने विषयाची मांडणी केली आहे.

त्याच प्रमाणे अभ्यासकाने मान्यताप्राप्त विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील चार प्राचार्यां पैकी ३ प्राचार्यांच्या प्रश्नावलीच्या द्वारे सदरील प्रकरणात संकलीत माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केलेले आहे.

तसेच अभ्यासकाने मान्यताप्राप्त विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील १७ अध्यापकांना प्रश्नावलीद्वारे सदरील प्रकरणात संकलित माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन केलेले आहे.

त्याच प्रमाणे अभ्यासकाने विनाअनुदानित अध्यापक विद्यालयात प्रशिक्षण घेणाऱ्या ७८० प्रशिक्षणार्थींच्या प्रश्नावली द्वारे मिळालेल्या माहितीचे सदरील प्रकरणात विश्लेषण आणि अर्थनिर्वचन केलेले आहे.

तसेच अभ्यासकाने विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील ग्रंथपाल, प्रशिक्षणार्थी, प्राध्यापक यांच्याशी चर्चा करुन, मुलाखती

होवून, प्रश्नावली भरून घेवून प्रत्यक्ष भेटी देवून माहिती मिळवून, माहिती संकलित केलेली असून याच प्रकरणात त्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केलेले आहे.

## ६.२ ** प्रश्नावलीच्या द्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व व अर्थ निर्वचन :-

अभ्यासकाने संशोधन विषयाच्या उद्दिष्टानुसार विना-अनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थीसाठी प्राचार्यांसाठी, अध्यापकांसाठी प्रश्नावली तयार केलेली आहे. ती प्रश्नावली परिशिष्ट क्रमांक २ मध्ये जोडलेली आहे. प्रश्नावली लवकरात लवकर भरून देण्यासाठी प्रश्नावली सोबतच विनंती पत्र ही जोडलेले आहे. सदर विनंती पत्र परिशिष्ट क्रमांक १ मध्ये जोडलेले आहे.

उस्मानाबाद जिल्हयातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील ५७ प्रशिक्षणार्थी की जे या जिल्हयातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयात प्रशिक्षण घेत आहेत, अशांना प्रश्नावलीचे वाटप केलेले होते. व त्यासोबत प्रश्नावली लवकरात लवकर भरून देण्याकरीताचे विनंती पत्रही जोडलेले होते. २० प्रशिक्षणार्थींना भेटून अभ्यासकाने त्यांच्या प्रतिक्रिया नमूद केल्या आहेत.

त्याच प्रमाणे उस्मानाबाद जिल्हयातील ४ प्राचार्यांना की, जे विनाअनुदानित अध्यापक विद्यालयात काम करतात यांना प्रश्नावलीचे वाटप केले होते. त्यासोबत प्रश्नावली लवकरात लवकर भरून पाठविण्याकरीताचे विनंतीपत्रही दिले होते. तीन प्राचार्यांनी प्रश्नावल्या भरून दिल्या.

तसेच उस्मानाबाद जिल्ह्यातील १७ प्राध्यापक की जे विना-अनुदानित अध्यापक विद्यालयात कार्यरत आहेत अशांना प्रश्नावलीचे वाटप केले होते. त्यासोबत प्रश्नावली लवकरात लवकर भरून पाठविण्या विद्यार्थीचे विनंतीपत्रही दिले होते.

अशा प्रकारे वरील प्रश्नावल्या व विनंतीपत्रही अभ्यासकाने १० मार्च १९९६ ते १० एप्रिल १९९६ या कालावधीमध्ये सर्वांना दिले होते. प्रश्नावली भरून घेण्यासाठी एक महिन्याचा कालावधी दिलेला होता. अशा प्रकारे अभ्यासकाने माहिती भरलेल्या प्रश्नावल्या मिळविल्या आहेत.

* कोष्टक क्रमांक ६.१ :-

// माहिती भरून मिळालेल्या प्रश्नावल्यांचा तपशील //

| अ.नं. | वर्गीकरण | तपशील | एकूण | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०१. | प्रथमवर्ष | प्रश्नावल्या पाठविल्या<br>भरून आलेल्या प्रश्नावल्या | ४२ | ४२ |
| | द्वीतियवर्ष | प्रश्नावल्या पाठविल्या<br>भरून आलेल्या प्रश्नावल्या | ३५ | ३५ |
| ०२. | स्त्री-प्रशिक्षणार्थी | प्रश्नावल्या पाठविल्या<br>भरून आलेल्या प्रश्नावल्या | -- | २१ |
| | पुरुष प्रशिक्षणार्थी | प्रश्नावल्या पाठविल्या<br>भरून आलेल्या प्रश्नावल्या | -- | ५६ |

वरील कोष्टक क्रमांक ६.१ मधील अ.नं. १ वरून असे दिसून आले की, प्रशिक्षणार्थींमध्ये प्रथमवर्षात प्रशिक्षण घेणारे प्रशिक्षणार्थी ४२ आणि ३५ द्वीतिय वर्षात प्रशिक्षण घेणारे प्रशिक्षणार्थी यांना प्रश्नावल्या दिल्या होत्या, त्यांचा तपशील खालील प्रमाणे:

| | | | | |
|---|---|---|---|---|
| [१] | प्रथमवर्षा प्रशिक्षणार्थी | १] पुरुष | : | ३१ |
| | | २] स्त्री | : | ११ |
| [२] | द्वीतियवर्षा प्रशिक्षणार्थी | १] पुरुष | : | २५ |
| | | २] स्त्री | : | १० |
| | | | | ७७ |

एकूण ४२ प्रथम वर्षा प्रशिक्षणार्थी आणि एकूण - ४० द्वीतिय वर्षा प्रशिक्षणार्थींना प्रश्नावल्या दिल्या होत्या त्या पैकी भरून आलेल्या प्रश्नावल्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| [१] | प्रथमवर्षा प्रशिक्षणार्थी | | : | ४२ |
| | | १] पुरुष | : | ३० |
| | | २] स्त्रि | : | १२ |
| [२] | द्वीतिय वर्षा प्रशिक्षणार्थी | | : | ४० |
| | | १] पुरुष | : | २५ |
| | | २] स्त्री | : | १५ |

वरील प्रशिक्षणार्थी हे पुरुष आणि स्त्री प्रशिक्षणार्थी प्रथमवर्षा आणि द्वीतियवर्षातील आहेत.

म्हणजेच ८० प्रशिक्षणार्थींना दिलेल्या प्रश्नावल्या पैकी ७७ प्रश्नावल्या भरून आल्या आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ९६.२५% आहे.

// प्रश्नावली विभाग १ वैयक्तिक माहिती //

प्रश्नावली विभाग १ मध्ये प्रतिसादक प्रशिक्षणार्थी यांची वैयक्तीक माहिती मिळालेली आहे. त्यामध्ये प्रशिक्षणार्थींचे संपूर्ण नांव - प्रश्न क्रमांक २ मध्ये शैक्षणिक पात्रता, प्रश्न क्रमांक - ३ मध्ये अध्यापक विद्यालयाचे नांव, प्रश्न क्रमांक ४ मध्ये निवडलेल्या अध्यापन पद्धती व प्रश्न क्रमांक ५ मध्ये विश्राम कक्ष यांची माहिती मिळालेली आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ५ बद्दल मिळालेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक २ मध्ये दिलेला आहे.

** कोष्टक क्रमांक ६.२ :-

// प्रतिसादक प्रशिक्षणार्थींचा "विश्राम कक्ष" माहितीचा //

| अ.नं. | विश्रामकक्ष | आहे | नाही | एकूण शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ०१] | प्रथमवर्ष | ३५ | ७ | १००% |
| ०२] | द्वीतिय वर्ष | ३४ | १ | १००% |
| ०३] | विद्यार्थी | ६६ | --- | १००% |
| ०४] | विद्यार्थीनी | २१ | --- | १००% |

वरील कोष्टक क्रमांक ६.२. वरुन प्रतिसादक प्रशिक्षणार्थींच्या विश्राम कक्ष माहितीवरुन वर्गीकरण केले आहे.

कोष्टक क्रमांक ६.२ मधील अ.नं. १ मध्ये प्रथमवर्ष प्रशिक्षणार्थींना पाठविलेल्या प्रश्नावलीतील प्रतिसादकांची माहिती आहे. त्यामध्ये विश्राम

कळत आहे असे ३५ एवढया प्रशिक्षणार्थींनी सांगितले आहे. आणि ७ एवढया प्रशिक्षणार्थींनी नाही सांगितले आहे. म्हणजेच प्रथम- वर्षातील ४२ एवढया प्रशिक्षणार्थींचा यात समावेश आहे.

कोष्टक क्रमांक ६.२ मधील अ.नं. २ मध्ये द्वीतिय वर्षातील प्रशिक्षणार्थींचा प्रतिसाद मिळालेला आहे. त्यात ३४ एवढया प्रशिक्षणार्थींनी होय असे उत्तर दिले आहे आणि ०१ एवढया प्रशिक्षणार्थींनी नाही असे उत्तर दिलेले आहे.

म्हणजेच द्वीतिय वर्षातील ३५ एवढया प्रशिक्षणार्थींचा यात समावेश आहे.

कोष्टक क्रमांक ६.२ मधील अ.नं. ३ मध्ये प्रथम वर्ष आणि द्वीतियवर्ष पुरुष प्रशिक्षणार्थींचा प्रतिसाद आहे. त्यामध्ये प्रथम वर्ष आणि द्वीतियवर्ष असेदोन भाग पाडलेले आहेत. प्रथम वर्षातील प्रशिक्षणार्थींना दिलेल्या प्रश्नावलीवरुन असे दिसून आले की, त्यामध्ये होय असे मत ३५ एवढयांनी नोंदवीले आणि नाही असे ७ एवढयांनी नोंदवीले, द्वीतिय वर्षातील प्रशिक्षणार्थींना दिलेल्या प्रश्नावली वरुन असे दिसले की, त्यामध्ये होय असे मत २३ एवढयांचे आणि नाही असे १ एवढयांनी नोंदविले आहे.

कोष्टक क्रमांक ६.२ मधील अ.नं. ४ मध्ये प्रथम वर्ष व द्वीतिय वर्ष महिला प्रशिक्षणार्थींचा प्रतिसाद आहे. त्यात प्रथम वर्षातील ११ एवढयांनी होय असे मत दर्शविले आहे आणि द्वीतिय वर्षातील १० एवढयांनी नाही असे मत दर्शविले आहे.

या संशोधनात उपयोगात आणलेल्या प्रथम व द्वीतिय वर्षातील पुरुष व महिला प्रशिक्षणार्थी ८२ या या मध्ये समावेश आहे.

याद्वारे यामध्ये एकूण ७७ प्रशिक्षणार्थींची संख्या असून शेकडा प्रमाण ९६% आहे.

प्रश्नावली विभाग २ मधील प्रश्न क्रमांक ६,७ च्या आधारे:-

अध्यापक विद्यालयात स्वतंत्र व्याख्यान कक्ष आहेत का? किती आहेत?

या बाबतच्या तपशीलाचा अभ्यास केला असता काही प्रशिक्षणार्थींनी स्वतंत्र व्याख्यान कक्ष आहेत असे दर्शविले तर काही प्रशिक्षणार्थींनी स्वतंत्र व्याख्यान कक्ष आहे असे दर्शविले आहे. यामध्ये स्वतंत्र व्याख्यान कक्ष आहे असे दर्शविणाऱ्या प्रशिक्षणार्थींचे शेकडा प्रमाण १० आहे. तर स्वतंत्र व्याख्यान नाही असे मत दर्शविणाऱ्या प्रशिक्षणार्थींचे शेकडा प्रमाण १० आहे. तर स्वतंत्र व्याख्यान कक्ष नाही असे मत दर्शविणाऱ्या प्रशिक्षणार्थींचे शेकडा प्रमाण २० आहे.

<u>प्रश्नावली विभाग २ मधील प्रश्न क्रमांक ८,९ च्या आधारे</u> :-

व्याख्यान कक्षातील बैठक व्यवस्था योग्य आहे का?
फलक व प्रकाश योजना शैक्षणिक दृष्टया योग्य आहे का?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असे दिसून आले की, अध्यापक विद्यालयातील व्याख्यान कक्षातील बैठक व्यवस्था योग्य आहे असे ६५ प्रशिक्षणार्थींनी नोंद केली तर १२ प्रशिक्षणार्थींनी बैठक व्यवस्था योग्य नाही असी नोंद केली म्हणजेच योग्य आहे या मताचे ८१% प्रशिक्षणार्थी आहेत तर योग्य नाही या मताचे १९% प्रशिक्षणार्थी आहेत.

त्याच प्रमाणे फलक व प्रकाश योजना शैक्षणिक दृष्टया योग्य

नाही या मताचे १०% प्रशिक्षणार्थी आहेत.

प्रश्नावली विभाग -३ विज्ञान प्रयोगशाळा प्रश्नावली विभाग ३ मधील प्रश्न क्रमांक १० व ११ हे विज्ञान प्रयोगशाळे संदर्भात आहेत. यामध्ये प्रश्न क्रमांक १० व ११ च्या आधारे.

अध्यापक विद्यालयामध्ये स्वतंत्र विज्ञान प्रयोगशाळा आहे का?
सराव पाठास लागणारे शैक्षणिक साहित्य पुरेशा प्रमाणात मिळते का?

या संबंधीच्या प्रश्न क्रमांक १० च्या तपशीलाचा अभ्यास अभ्यासकाने केला असता अध्यापक विद्यालयामध्ये स्वतंत्र विज्ञान प्रयोगशाळा आहे असे मत दर्शविणारे प्रतिसादक शेकडा ८५ एवढे प्रतिसादक आहेत. तर स्वतंत्र विज्ञान प्रयोगशाळा नाही असे मत दर्शविणारे प्रतिसादक शेकडा १५ एवढे आहेत.

त्याचप्रमाणे सरावपाठास लागणारे शैक्षणिक साहित्य प्रयोगशाळेत मिळते असे ८३% एवढ्या प्रतिसादकांनी नोंदविले आहे तर १०% एवढ्या प्रतिसादकांनी शैक्षणिक साहित्य काही प्रमाणात मिळते असे नोंदविले आहे. तर ७% एवढ्या प्रतिसादकांनी सरावपाठास लागणारे शैक्षणिक साहित्य अध्यापक विद्यालयात मिळत नाही असी नोंद केली आहे.

** <u>प्रश्नावली विभाग ४ ग्रंथालय</u> :-

या विभागातील प्रश्न क्रमांक १२ व १३ च्या आधारे.

अध्यापक विद्यालयाचे स्वतंत्र ग्रंथालय आहे का?

ग्रंथालयात आवश्यक ती संदर्भ पुस्तके मिळतात का? या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील शेकडा ८३% एवढ्या प्रशिक्षणार्थींनी स्वतंत्र ग्रंथालय नाही असे मत दर्शविले तर शेकडा १७% एवढ्या प्रशिक्षणार्थींनी स्वतंत्र ग्रंथालय आहे असे मत दर्शविले आहे.

तसेच ग्रंथालयात आवश्यक ती संदर्भ पुस्तके मिळतात असे मत शेकडा ८५% एवढ्या प्रतिसादकांनी नोंद केली तर संदर्भ ग्रंथ मिळत नाहीत असे मत शेकडा १५% एवढ्या प्रतिसादकांनी नोंद केली.

** <u>प्रश्नावली विभाग ४ मधील प्रश्न क्रमांक १४ व १५ च्या आधारे</u> :-

सरावपाठासाठी लागणारी शालेय पाठ्यपुस्तके मिळतात का? ग्रंथपालाकडून सहकार्य मिळते का?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता सरावपाठासाठी लागणारी शालेय पाठ्यपुस्तके मिळतात असे ९०% एवढ्या प्रतिसादकांनी नोंद केली आहे तर सरावपाठासाठी लागणारी शालेय पाठ्यपुस्तके मिळत नाहीत असी नोंद १०% एवढ्या प्रतिसादकांनी नोंद केली. तर ग्रंथपालाचे सहकार्य मिळते असे. ९५% एवढ्या प्रतिसादकांनी नोंद केली आणि ग्रंथपालाचे सहकार्य मिळत नाही असी नोंद ५% एवढ्या प्रतिसादकांनी नोंद केली आहे.

** <u>प्रश्नावली विभाग ४ मधील प्रश्न क्रमांक १६ च्या आधारे</u> :-

ग्रंथालयात प्रशिक्षणार्थींसाठी अभ्यासिका आहे का?

या संबंधीच्या तपशिलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता स्वतंत्र

अभ्यासिका आहे असे मत शेकडा ७५% एवढ्या प्रशिक्षणार्थींचे आणि स्वतंत्र अभ्यासिका नाही असे मत शेकडा २५% एवढ्या प्रशिक्षणार्थींनी नोंदविले आहे.

<u>प्रश्नावली विभाग ५ क्रिडांगण</u> :-

<u>प्रश्नावली विभाग ५ मधील प्रश्न क्रमांक १७ व १८ च्या आधारे</u> :-

क्रिडांगण आहे का?

शारीरिक शिक्षणासाठी आवश्यक असणारे क्रिडा साहित्य मिळते का?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता अध्यापक विद्यालयात क्रिडांगण आहे असे मत शेकडा ६५% एवढ्या प्रतिसादकांनी नोंदविले तर क्रिडांगण नाही असे मत शेकडा ३५% एवढ्या प्रतिसादकांनी नोंदविले. याच विभागातील प्रश्न क्रमांक १८ च्या तपशीलाचा अभ्यास केला असता आवश्यक असणारे क्रिडा साहित्य मिळते असे मत शेकडा ६५% एवढ्या प्रतिसादकांचे तर कांही प्रमाणात क्रिडा साहित्य मिळते असे मत शेकडा ३०% एवढ्या प्रतिसादकांचे आणि क्रिडा साहित्य मिळत नाही असे मत शेकडा ५% एवढ्या प्रतिसादकांचे आहे.

<u>प्रश्नावली विभाग ६ कार्यानुभव</u> :-

<u>प्रश्नावली विभाग ६ मधील प्रश्न क्रमांक १९ च्या आधारे</u> :-

कार्यानुभवासाठी कोणकोणते उपक्रम घेतले जातात

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता ६०% एवढ्या प्रतिसादकांनी कागदकाम, स्वच्छता, साफ-सफाई इत्यादी उपक्रम घेतले जातात असे निदर्शनात आले तर २५% एवढ्या प्रतिसादकांच्या

प्रतिसादातून ट्रे, कागदाचे हार, लेटर बॉक्स इत्यादी वस्तू तयार केल्या असे निदर्शनास आले आणि १५% एवढया प्रतिसादकांनी कोणत्याच वस्तू तयार केल्या नाहीत असे निदर्शनास आले. ८५% एवढया प्रतिसादकांनी तज्ञांकडून मार्गदर्शन मिळते असी नोंद केली तर १५% एवढया प्रतिसादकांनी तज्ञांकडून मार्गदर्शन मिळत नाही असी नोंद केली आहे.

** प्रश्नावली विभाग - ७ सरावपाठ **

प्रश्नावली विभाग ७ मधील प्रश्न क्रमांक २२ व २३ च्या आधारे:-

सरावपाठाच्या मार्गदर्शनासाठी स्वतंत्र खोल्यांची व्यवस्था आहे काय?

या बाबतच्या प्रश्नाला प्रतिसाद असा मिळाला आहे की, ८५% एवढया प्रतिसादकांनी मार्गदर्शनासाठी स्वतंत्र खोल्यांची व्यवस्था आहे असे नोंदविले आहे, तर १५% एवढ्या प्रतिसादकांनी मार्गदर्शनासाठी स्वतंत्र खोल्या नाहीत असी नोंद केली आहे.

** पाठासाठी लागणारे शैक्षणिक साहित्य मिळते का?

या संबंधीचा अभ्यासकाने अभ्यास केला असता अध्यापक विद्यालयात पाठास लागणारे शैक्षणिक साहित्य मिळते असे ९०% एवढया प्रतिसादकांनी नोंद केली ७% एवढया प्रतिसादकांनी शैक्षणिक साहित्य काही प्रमाणात मिळते असी नोंद केली, तर ३% एवढया प्रतिसादकांनी कोणतेच शैक्षणिक साहित्य मिळत नाही असी नोंद केलेली आहे.

** प्रश्नावली विभाग ७ मधील प्रश्न क्रमांक २४ च्या आधारे :-

पाठासाठी लागणारे शैक्षणिक साहित्य तयार करण्यास मार्गदर्शन मिळते का?

या बाबतच्या प्रश्नाला प्रतिसाद असा मिळाला की, पाठासाठी लागणारे शैक्षणिक साहित्य तयार करण्यास मार्गदर्शन मिळते असे ८३% एवढया प्रतिसादकांनी नोंदविले तर १५% एवढया प्रतिसादकांनी मार्गदर्शन कांही प्रमाणात मिळते अशी नोंद केली आणि २% एवढया प्रतिसादकांनी मार्गदर्शन मिळत नाही अशी नोंद केली.

** प्रश्नावली विभाग ७ मधील प्रश्न क. २५ व २६ च्या आधारे:-

xx सरावपाठ घेताना कोणकोणत्या अडचणी येतात?

या संबंधीचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असे निदर्शनास आले की, ९५% एवढया प्रतिसादकांनी अडचणी येत नाहीत असी प्रश्नावलीत नोंद केली तर एवढया ५% प्रतिसादकांनी अडचणी येतात असी नोंद केली. त्यामध्ये शैक्षणिक साहित्य उपलब्ध नाही, मार्गदर्शन मिळत नाही. अशा प्रकारच्या अडचणी येतात असे नमुद केले आहे.

** अडचणी दूर करण्यासंबंधी पाठ्यापकाकडून सहकार्य मिळते का?

या बाबीचा अभ्यासकाने अभ्यास केला असता ९९% एवढया प्रतिसादकांनी सहकार्य मिळते असे सांगितले तर १% एवढया प्रतिसादकांनी सहकार्य मिळत नाही असे सांगितले.

** प्रश्नावली विभाग ८ [मधील] सूक्ष्म अध्यापन :-

या विभागातील प्रश्न क्रमांक २७ च्या आधारे

सूक्ष्म अध्यापनासाठी किती पाठ घेतले?

या बाबींचा अभ्यासकाने अभ्यास केला असता ९६.२५% प्रतिसादकांनी आठ पाठ सुक्ष्मअध्यापनासाठी घेतले असी नोंद केली आहे.

** प्रश्न क्रमांक २८ च्या आधारे :-

सूक्ष्म अध्यापनासाठी कोणकोणती अध्यापन कौशल्ये घेतली?

या बाबींचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असे निदर्शनास आले की, एकुण आठ अध्यापन कौशल्ये प्रस्तावना, चेतक बदल, कथन, स्पष्टीकरण, प्रश्न विचारणे, दिग्दर्शन, फलक लेखन, उदा. व दाखल्यांचा वापर ही घेतली असे निदर्शनास आले.

** विभाग ८ मधील प्रश्न क्रमांक २९ व ३० च्या आधारे :-

सहशालेय कार्यक्रम करताना कोणकोणत्या अडचणी आल्या?

या बाबींचा अभ्यास केला असता ७७ प्रतिसादकांनी अडचणी आल्या नाहीत असे नोंद केली आहे.

* अध्यापक विद्यालयात गुणवत्ता वाढीसाठी कोणकोणते उपक्रम घेतले जातात?

या बाबींचा अभ्यास केला असता २ प्रशिक्षणार्थींनी कोणतेच उपक्रम घेतले जात नाहीत असी नोंद केली तर ७५ एवढ्या प्रतिसादकांनी व्याख्यानमाला सराव परीक्षा असे उपक्रम घेतले जातात असी नोंद केली आहे.

** विभाग ८ मधील प्रश्न क्रमांक ३१, ३२ व ३३ च्या आधारे :-

गुणवत्ता वाढीसाठी वेगवेगळ्या उपक्रमांचा उपयोग झाला का?

या संबंधीचा अभ्यासकाने अभ्यास केला असता ५ एवढया प्रतिसादकांनी प्रतिसाद दिला नाही. तर २ एवढया प्रतिसादकांनी गुणवत्ता वाढीसाठी उपयोग झाला नाही असे मत नोंदविले आणि ७० एवढया प्रतिसादकांनी गुणवत्ता वाढीसाठी उपयोग झाला असे मत नोंदविले आहे.

**गुणवत्ता वाढीसाठी कोणते उपक्रम असावेत असे आपणास वाटते?

या संबंधीचा अभ्यासकाने अभ्यास केला असता विविध विषयांवरील स्पर्धा परीक्षा, ग्रंथालय, सराव परीक्षा इत्यादी उपक्रम घेतले जावेत। असे मत ७० एवढया प्रतिसादकांनी नोंदविले तर इतर उपक्रम असावेत असे ७ एवढया प्रतिसादकांनी नोंदविले आहे।

** अध्यापक विद्यालयात कोणकोणत्या शैक्षणिक सुविधा असाव्यात असे आपणास वाटते?

या संबंधी ८०७ प्रतिसादकांनी प्रतिसाद दिला त्या मध्ये वेगवेगळ्या शैक्षणिक सुविधा असाव्यात असे मत प्रतिसादकांचे आहे त्यात योग्य संदर्भ साहित्य उपलब्ध असावे, खेळाचे साहित्य असावे, प्रयोगशाळा असावी, ग्रंथालय असावे असी वेगवेगळ्या शैक्षणिक सुविधा असाव्यात असे प्रतिसादकांचे मत आहे.

** कोष्टक क्रमांक ६.३ :-

"प्राचार्य प्रश्नावली तपशील "

| तपशील | विना अनुदानित अध्यापक विद्यालय | एकूण |
|---|---|---|
| पाठविलेल्या प्रश्नावल्या | ०४ | ०४ |
| भरुन आलेल्या प्रश्नवल्या | ०३ | ०३ |
| भरुन आलेल्या प्रश्नावलीचे शेकडा प्रमाण | ७५% | -- |

वरील कोष्टक क्रमांक ६.३ वरुन असे आढळून आले की, अभ्यासकाने प्राचार्यांना प्रश्नावल्या पाठविल्या होत्या. त्यामध्ये विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील [फक्त उस्मानाबाद जिल्हा ] प्राचार्यांना प्रश्नावल्या पाठविल्या होत्या. त्यापैकी ०३ प्रश्नावल्या भरुन आलेल्या आहेत. म्हणजेच त्याचे शेकडा प्रमाण ७५% इतके आहे.

प्रश्नावलीतील विभाग १ मध्ये या ०३ प्रतिसादक प्राचार्यांची वैयक्तीक माहिती मिळविलेली आहे. प्रश्नावलीत आगोदर अध्यापक विद्यालयाचे नांव, प्रश्नक्रमांक १ मध्ये प्रतिसादकाचे संपूर्ण नांव, प्रश्न क्रमांक २ मध्ये प्रतिसादकांची शैक्षणिक अर्हता त्यामध्ये तीन उपप्रश्न आहेत. त्यामध्ये प्रतिसादकाचे पदवी

परीक्षेचे विषय, पदव्युत्तर परीक्षेचे विषय, डी.एड्.बी.एड्. बी.पी.एड्. चे विशेष अध्यापन पद्धतीचे विषय इत्यादी माहिती मिळालेली आहे.

** कोष्टक क्रमांक : ६.४ :-

| अ.नं. | शैक्षणिक व व्यावसायिक | प्रतिसादक प्राचार्यांची संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | एम.ए. एम.एड्. | ०१ | २५% |
| ०२. | एम.ए.बी.एड्. | ०१ | २५% |
| ०३. | बी.ए.बी.पी.एड्. | ०१ | २५% |

वरील कोष्टक क्रमांक ६.४ वरून असे आढळून आले की, प्रतिसादक प्राचार्यांपैकी बी.ए. बी.पी.एड्. १%, एम.ए.एम.एड्. १, एम.ए. बी.एड. १ आहेत.

या संशोधनात उपयोगात आणलेले एकूण प्राचार्य हे प्रशिक्षित आहेत. प्रशिक्षीत प्राचार्यांचे प्रमाण १००% आहे.

// प्रतिसादक एकूण प्राचार्यांच्या पदवी पदव्युत्तर विषयाचे वर्गीकरण //

** कोष्टक क्रमांक : ६.५

| अ.नं. | पदवी | विषय | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ०१. | एम.ए.बी.एड्. | इतिहास | ०१ | २५% |
| ०२. | बी.ए.बी.पी.एड् | अर्थशास्त्र, हिंदी इतिहास. | ०१ | २५% |
| ०३. | एम.ए.एम.एड्. | इतिहास | ०१ | २५% |

वरील कोष्टक क्रमांक ६.५ वरुन असे आढळून आले की, इतिहास विषय असणारे दोन प्राचार्य एम.ए.ला घेतलेले आहेत. तर एक प्राचार्यांनी बी.ए.साठी अर्थशास्त्र, हिंदी, इतिहास हे विषय घेतलेले आहेत.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ३/४ मधील प्राचार्य म्हणून अध्यापक विद्यालयात किती वर्षे काम केले आणि प्राचार्य म्हणून किती वर्षांचा अनुभव या बाबतच्या माहितीचा तपशील कोष्टक क्रमांक ६.६ मध्ये दिलेला आहे.

// प्रतिसादक एकूण प्राचार्यांचे अध्यापनाची वर्षे, अनुभवावरून वर्गीकरण //

| अ.नं. | अध्यापनचा अनुभव वर्षे | प्रति संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | ० ते ५ | ०२ | ५०% |
| ०२. | ११ ते १५ | ०१ | २५% |
| ०३. | १६ ते २० | — | — |
| | एकूण | ०३ | ७५% |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, ५०% म्हणजेच दोन प्राचार्यांचा अनुभव ० ते ५ वर्षां दरम्यान आहे तर २५% प्राचार्यांचा म्हणजेच एका प्राचार्यांचा ११ ते १५ वर्षांचा दरम्यान अनुभव आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ५ च्या आधारे :-

प्राध्यापकांच्या नेमणूका शासकीय नियमानुसार होतात का?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता प्रत्येक अध्यापक विद्यालयामध्ये प्राध्यापकांच्या नेमणूका शासकीय नियमानुसार होतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ६ च्या आधारे :-

आपल्या अध्यापक विद्यालयात किती मुलांना प्रवेश दिला आहे?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता प्रत्येक अध्यापक विद्यालयामध्ये ८० मुलांना प्रवेश दिला आहे. त्यामध्ये प्रथम

वर्गासाठी ४० मुलांना आणि द्वितीय वर्गासाठी ४० मुलांना प्रवेश दिला आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ७, ८ च्या आधारे :-

वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील किती मुलांना प्रवेश दिला आहे?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता प्रत्येक अध्यापक विद्यालयामध्ये वाणिज्य विज्ञान शाखेच्या १०% मुलांना प्रवेश दिला जातो आणि विज्ञान शाखेतील ४०% मुलांना प्रवेश दिला जातो.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ९ च्या आधारे :-

शासकीय नियमानुसार इमारत आहे का?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता प्रत्येक अध्यापक विद्यालयाची इमारत ही शासकीय नियमानुसार आहे अशी माहिती मिळाली आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १० च्या आधारे :-

संस्था चालकांचे सहकार्य मिळते का?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असा प्रतिसाद मिळाला की संस्था चालकांचे सहकार्य मिळते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ११ च्या आधारे

मुलांच्या सुप्तगुणांना वाव देण्यासाठी कोणकोणते उपक्रम राबवले जातात?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असा प्रतिसाद मिळाला की मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी अध्यापक विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, व्याख्यानमाला चर्चा सत्र इत्यादी कार्यक्रम राबवले जातात.

<u>प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १२ च्या आधारे</u> .-

सरावपाठाचे वेळी शाळेकडून त्रास होतो का?

या बाबत अभ्यासकाने अभ्यास केला असता २ एवढया प्रतिसादकांनी शाळेकडून त्रास होत नाही असा प्रतिसाद दिला तर १ एवढया प्रतिसादकांनी शाळेकडून त्रास होतो असा प्रतिसाद दिला.

<u>प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १३ च्या आधारे</u> :-

शासकीय नियमानुसार अध्यापक विद्यालयात ग्रंथालय आहे का?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असा प्रतिसाद मिळाला की, अध्यापक विद्यालयात शासकीय नियमानुसार ग्रंथालय आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १४ व १५ च्या आधारे शैक्षणिक प्रशासकीय कर्तव्ये पार पाडताना अडचणी येतात का?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असा प्रतिसाद मिळाला की शैक्षणिक प्रशासकीय कर्तव्य पार पाडताना अडचणी येत नाही असा २ एवढया प्रतिसादकांनी प्रतिसाद दिला १ एवढया प्रतिसादकांनी अडचणी येतात असा प्रतिसाद दिला.

कोणत्या अडचणी येतात.

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता प्रतिसाद मिळाला नाही.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १६ च्या आधारे :-

सर्व अध्यापन पद्धतीसाठी स्वतंत्र प्राध्यापक आहे का?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असे दिसून आले की, सर्व अध्यापक विद्यालयामध्ये सर्व अध्यापन पद्धतीसाठी स्वतंत्र प्राध्यापक आहेत.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १७ व १८ च्या आधारे सराव पाठास शाळा घेतल्यावर तुम्हाला कोणकोणत्या अडचणी येतात?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असे दिसून आले की, २ अध्यापक विद्यालयातील प्राचार्यांकडून याना अडचणी येत नाहीत असा प्रतिसाद मिळाला तर १ एवढ्या अध्यापक विद्यालयातील प्राचार्यांकडून अडचणी येता असा प्रतिसाद मिळाला आहे.

त्या सोडविण्यासाठी आपण कोणते प्रयत्न करता?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, २ अध्यापक विद्यालयास अडचणी येत नाहीत. १एवढे प्राचार्य त्या त्या शाळेच्या मुख्याध्यापकांशी चर्चा करून अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करतात.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १९ च्या आधारे

सराव पाठाच्या नियोजना बाबत आपण समाधानी आहात का?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असे दिसून आले की, सर्व अध्यापक विद्यालयातील प्राचार्य सराव पाठाच्या नियोजना

समाधानी आहेत.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २० व २१ च्या आधारे :-

सराव पाठा संबंधी आपण काही सूचना करु इच्छिता का?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असे दिसून आले की, ३ अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांकडून याः प्रतिसाद मिळाला आहे. बाकीच्या १ प्राचार्यांकडून नकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. म्हणजे २५% नकारात्मक प्रतिसाद आहे.

असल्यास कोणत्या सूचना करु इच्छितात :-

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असे दिसून आले की, सुचना करु इच्छितो असा प्रतिसाद मिळाला परंतु कोणत्या सुचना करु इच्छिता याला प्रतिसाद मिळाला नाही. म्हणजे १००% नकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २२ च्या आधारे :-

प्रशिक्षणार्थींना आवश्यक ती सर्व पुस्तके वेळेवर दिली जातात का?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असे दिसून आले की, चार अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांकडून याः प्रतिसाद मिळाला आहे. म्हणजेच ७५% होकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २३ च्या आधारे :-

आपल्याकडे किती अध्यापन पद्धती शिकविण्याची सोय आहे?

या संबंधीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असे दिसून आले की, यात ७५% प्रतिसाद मिळाला आहे. या तपशीला मध्ये १० अध्यापन पध्दती शिकविण्याची सोय आहे.

** कोष्टक क्रमांक : ६.७ :-

// अध्यापक विद्यालयातील प्राध्यापकांकडून भरुन आलेल्या प्रश्नावलीचा तपशील //

| अ.नं. | तपशील | अध्यापक विद्यालयातील प्राध्यापक | एकूण |
|---|---|---|---|
| ०१. | पाठविलेल्या प्रश्नावल्या | २४ | २४ |
| ०२. | भरुन आलेल्या प्रश्नावल्या | १८ | १९ |
| ०३. | भरुन आलेल्या प्रश्नावलीचे शेकडा प्रमाण | ७९.१६% | |

वरील कोष्टक क्रमांक ६.७ वरुन असे आढळून आले की, अभ्यासकाने उस्मानाबाद जिल्ह्यातील चार विनाअनुदानित अध्यापक विद्यालयाती २४

प्राध्यापकांना प्रश्नावल्या पाठविल्या होत्या. त्यापैकी १९ प्राध्यापकांनी प्रश्नावल्या भरून पाठविल्या म्हणजेच प्रश्नावली भरून येण्याचे शेकडा प्रमाण ७९.१६% इतके आहे.

प्रश्नावलीत आगोदर अध्यापक विद्यालयाचे नाव, प्रश्न क्रमांक १ मध्ये प्रतिसादक प्राध्यापकाचे संपूर्ण नाव, प्रश्न क्रमांक २ मध्ये प्रतिसादकाची शैक्षणिक अर्हता आणि यातील एका उपप्रश्नाद्वारे प्रतिसादकांची पदवी, विषय, पदवी उत्तीर्ण वर्ष आणि मिळालेली श्रेणी इत्यादी माहिती मिळालेली आहे.

// प्रतिसादक प्राध्यापकांच्या पदवी/पदव्युत्तर विषयाचे वर्गीकरण //

** कोष्टक क्रमांक ६.८ :-

| अ.नं. | पदवी | विषय | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ०१. | बी.ए.बी.एड. | इतिहास, अर्थशास्त्र, इंग्रजी, मराठी, हिंदी | ०६ | २५% |
| ०२. | एम.ए.बी.एड. | इंग्रजी, हिंदी, मराठी | ०४ | १६.६६% |
| ०३. | बी.ए.बी.पी.एड. | हिंदी, राज्यशास्त्र, इतिहास, मराठी | ०२ | ८.३३% |
| ०४. | एम.कॉम.बी.एड. | अर्थशास्त्र, लेखाकार्य | ०१ | ४.१६% |
| ०५. | बी.एस्सी.बी.एड. | जीव, भौतिक, रसायन | ०१ | ४.१६% |
| ०६. | एम.एस्सी.बी.एड. | बॉटनी, गणित | ०३ | १२.५% |
| ०७. | इतर | चित्रकला, कार्यानुभव | ०२ | ८.३३% |

वरील कोष्टक क्रमांक ६.८ वरून असे आढळून आले की, बी.ए. बी.एड्. झालेल्या प्राध्यापकांची संख्या ६ असून, शेकडा, प्रमाण २५% आहे एम.ए.बी.एड्. झालेले प्रतिसादक प्राध्यापक ४ असून शेकडा प्रमाण १६.६६% आहे. एम.कॉम.बी.एड्. झालेले प्रतिसादक १ असून शेकडा प्रमाण ४.१६ आहे. बी.एस्सी. बी.एड्. झालेले प्रतिसादक १ असून, शेकडा प्रमाण ४.१६ आहे. एम.एस्सी.बी.एड्. झालेले प्रतिसादक ३ असून शेकडा प्रमाण १२.५ आहे.

यामध्ये सर्वात जास्त शेकडा प्रमाण बी.ए.बी.एड्. यांचे आहे. ते २५% शेकडा आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ३ व ४ च्या आधारे :-

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ३ व ४ आधारे प्राध्यापक म्हणून या अध्यापक विद्यालयात किती वर्षे काम करत आहात? आणि प्राध्यापक म्हणून किती वर्षांचा अनुभव आहे. या बाबतच्या माहितीचा तपशील कोष्टक क्रमांक ६.९ मध्ये दिलेला आहे.

** कोष्टक क्रमांक ६.९ :-

प्राध्यापकांचे अध्यापन - अनुभवावरून वर्षांचे वर्गीकरण :-

| अ.नं. | या विद्यालयात अध्यापन | प्रति संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | ० ते ५ | १८ | ७५% |
| ०२. | ६ ते १० | ०१ | ४.१६% |
| ०३. | ११ ते १५ | | |
| ०४. | १६ ते २० | | |
| ०५. | २१ ते २५ | | |

वरील कोष्टक क्रमांक ६.९ वरून असे आढळून आले की, एकूण प्रतिसादक प्राध्यापकांपैकी ० ते ५ वर्षे अध्यापन अनुभव असणाऱ्यांची संख्या १८ असून शेकडा प्रमाण ७५% आहे. ६ ते १० वर्षे अनुभव असणाऱ्यांची संख्या १ असून शेकडा प्रमाण ४.१६ आहे.

यावरून ० ते ५ अनुभव असणाऱ्यांची सर्वात जास्त संख्या असून ६ ते १० वर्षे अनुभव असणाऱ्यांची संख्या सर्वात कमी आहे.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ५ च्या आधारे :-

आपली नेमणूक शासकीय नियमानुसार झाली आहे काय?

या संबंधीच्या माहितीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता सर्व प्रतिसादकांनी त्यांची नेमणूक शासकीय नियमानुसार झाली आहे असा प्रतिसाद दिला.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ६ च्या आधारे :-

आपणास शासकीय नियमानुसार वेतन दिले जाते काय?

या संबंधीच्या माहितीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता १५ प्रतिसादकांनी शासकीय नियमानुसार वेतन दिले जाते असा प्रतिसाद दिला तर ४ प्रतिसादकांनी नकारात्मक प्रतिसाद दिला.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ७ च्या आधारे :-

आपली नेमणूक तात्पुरती की कायम स्वरूपी झाली आहे?

या संबंधीच्या माहितीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता १९ प्रतिसादकानी दिला हा प्रतिसाद होकारात्मक मिळालेला आहे.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ८ च्या आधारे :-

विश्रांतीसाठी स्वतंत्र प्राध्यापक कक्ष आहे का?

या संबंधीच्या माहितीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता १००% प्रतिसाद मिळाला आहे. या माहितीच्या संबंधीचा तपशीलाचा प्रतिसाद हा पूर्ण होकारात्मक आहे.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ९ च्या आधारे :-

आपण कोणत्या विषयाचे अध्यापन करता?

या संबंधीच्या माहितीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता पूर्ण प्रतिसाद मिळाला यात प्रत्येक प्रतिसादकांनी ते अध्यापन करत असलेल्या विषयाची नावे दिलेली आहे.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १० च्या आधारे :-

आपण आत्तापर्यंत कोणकोणते अध्यापन विषयक कोर्स केले आहेत?

या संबंधीच्या माहितीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असा प्रतिसाद मिळाला की एकही अध्यापन विषयक कोर्स केला नाही अशा प्रतिसादकांची संख्या १५ असून शेकडा प्रमाण ६२.५ आहे. बी. एड्. नविन अभ्यासक्रमाचा १५ दिवसाचा म. रा. शि.सं.व प्र. केंद्र पुणे येथे डी.पी.ई.पी. या आनंददायी प्रशिक्षण कोर्स करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या २ असून त्याचे शेकडा प्रमाण ८.३३% आहे. तसेच इतर काही कोर्स करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या २ आहे.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ११ च्या आधारे :-

आपणास इतर प्राध्यापकांचे सहकार्य मिळते का?

या संबंधीच्या माहितीच्या तपशीला T अभ्यासकाने अभ्यास केला असता इतर प्राध्यापकांचे सहकार्य मिळते असा १००% प्रतिसाद मिळाला.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १२ च्या आधारे :-

सूक्ष्म अध्यापन पाठाचे वेळी आपण कोणत्या कौशल्यपाठाचे दिग्दर्शन केले?

या संबंधीच्या माहितीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता २४ प्रतिसादकांनी प्रतिसाद दिला म्हणजेच शेकडा १००% प्रतिसाद मिळालेला आहे. या मध्ये प्रतिसादकांनी आपण केलेल्या कौशल्य पाठाची नावे दिली आहेत त्यात फलक लेखन, प्रश्नावली, प्रस्तावना, चेतन बदल, दृक श्राव्य साधनांचा वापर, कथन इत्यादी कौशल्यांची नांवे मिळालेली आहेत.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १३ च्या आधारे :-

अध्यापन कक्षामधील फलक व प्रकाश योजना शैक्षणिक दृष्ट्या योग्य आहे काय?

या संबंधीच्या माहिती वरून असे दिसून आले की, एकूण प्रतिसादक प्राध्यापकांच्या अध्यापन कक्षा मधील फलक व प्रकाश योजना शैक्षणिक दृष्ट्या योग्य आहे.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १४ च्या आधारे :-

ग्रंथालयातून आवश्यक ती संदर्भ पुस्तके मिळतात काय?

या संबंधीच्या माहिती वरून असे दिसून आले की, एकूण प्रतिसादकां पैकी १६ एवढ्या प्रतिसादकांनी ग्रंथालयातून आवश्यक ती संदर्भ पुस्तके मिळतात असा प्रतिसाद दिला. २ प्रतिसादकांनी संदर्भ पुस्तके काही

प्रमाणात मिळतात असा प्रतिसाद मिळाला तर १ प्रतिसादकांनी संदर्भ पुस्तके मिळत नाहीत असा प्रतिसाद मिळाला.

सर्वात जास्त प्रमाण संदर्भ पुस्तके मिळतात अशा प्रतिसादकांचे आहे.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १५ च्या आधारे :-

आपल्या मते ग्रंथालयाचा दर्जा साधारणत: कशा प्रकरचा आहे?

या संबंधीच्या माहिती वरुन असे दिसून आले की, एकूण प्रतिसादकां पैकी १४ सवढया प्रतिसादकांनी ग्रंथालयाचा दर्जा उत्कृष्ठ आहे असा - ४ एवढया प्रतिसादकांनी चांगला आहे, असा तर १ एवढया प्रतिसादकांनी दर्जा साधारण आहे असा प्रतिसाद दिलेला आहे.

म्हणजेच ग्रंथालयाचा दर्जा उत्कृष्ठ आहे हा प्रतिसाद जास्त मिळाला आहे त्याचे शेकडा प्रमाण ५८.३३% आहे.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १६ च्या आधारे :-

सराव पाठासाठी शाळा कुठलया निवडता?

या संबंधीच्या माहितीचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असे दिसते की, ४ एवढया प्रतिसादकांनी सराव पाठासाठी शाळा गावातीलच निवडतो असा प्रतिसाद दिला ४ प्रतिसादकांनी बाहेरच्या शाळा निवडतो असा प्रतिसाद दिला तर ११ प्रतिसादकांनी दोन्ही प्रकारच्या शाळा निवडतो असा प्रतिसाद मिळाला. म्हणजेच ११ हा प्रतिसाद सर्वात जास्त आहे.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १७ च्या आधारे :-

सरावपाठ विषयी प्रशिक्षणार्थींच्या बाबतीत आपण समाधानी आहात काय?

या संबंधीच्या माहितीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असे दिसते की, १८ एवढे प्रतिसादक समाधानी आहेत १ प्रतिसादक काही प्रमाणात समाधानी आहेत तर ० प्रतिसादक समाधानी नाही म्हणजेच समाधानी हे प्रमाण जास्त आहे. त्याचे शेकडा प्रमाण ७५% आहे.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १८ व १९ च्या आधारे :-

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १८ व १९ च्या आधारे सराव पाठाचे नियोजन व अंम्मलबजावणी बाबत समाधानी आहात का? नसल्यास कोणत्या कारणामुळे?

या संबंधीच्या माहितीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असे दिसते की, १४ प्रतिसादकांनी समाधानी आहोत असा प्रतिसाद दिला ३ प्रतिसादकांनी काही प्रमाणात समाधानी आहोत असा प्रतिसाद दिला तर २ प्रतिसादकांनी समाधानी नाही असा प्रतिसाद दिला.

म्हणजेच यावरून समाधानी प्रतिसाद सर्वात जास्त आहे. त्याचे शेकडा प्रमाण ५८.३३% इतके आहे. नसल्यास कोणत्या कारणाने या बाबत प्रतिसाद मिळाला नाही.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २० व २१ च्या आधारे सराव पाठाच्या संदर्भात आपण काही सुचना करु इच्छिता काय? असल्यास कोणत्या?

या संबंधीच्या माहितीच्या तपशीला वरुन असे आढळून येते की, ५ प्रतिसादक सुचना करु इच्छितात १४ प्रतिसादक सुचना करु इच्छित नाहीत

नाहीत. सुचना करु इच्छिणाऱ्या प्रतिसादकांनी कोणत्या सुचना करु इच्छितात त्याला प्रतिसादकांनी प्रतिसाद दिला नाही. तर ४ प्रतिसादकांनी पाठात शैक्षणिक साहित्य वापरले पाहिजे, सुक्ष्म पाठात घेतलेल्या कौशल्यांचा पाठात जास्तीत जास्त वापर केला पाहिजे, निरीक्षक प्राध्यापकांनी प्रशिक्षणार्थींचे सराव पाठ पूर्ण निरीक्षण करावेत इत्यादी प्रकारच्या सुचना दिल्या आहेत. त्याचे काटेकोर पालन व्हावे असे प्रतिसादकांना वाटते.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २२ च्या आधारे :-

आपण कोणत्या विभागाचे काम पाहता?

या संबंधीच्या माहितीच्या तपशिला वरुन असे आढळून आले की, सर्व प्रतिसादकांनी या बाबत प्रतिसाद दिलेला आहे. त्यामध्ये सांस्कृतिक विभाग, पाठ विभाग, परीक्षा विभाग, हजेरी विभाग इत्यादी बाबत प्रतिसाद मिळालेला आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २३ च्या आधारे :-

मानसशास्त्र प्रयोग कोणत्या पध्दतीने घेतले जातात?

या संबंधीच्या माहितीच्या तपशीला वरुन असे दिसून आले की, ४ प्रतिसादकांनी मानसशास्त्र प्रयोग गट करुन घेतले जातात असा प्रतिसाद दिला तर १५ प्रतिसाद-कांनी सर्व विद्यार्थी एकत्र बसवून प्रयोग घेतले जातात. यात एकत्र करुन प्रयोग प्रतिसादकांचे प्रमाण जास्त आहे. त्याचे शेकडा प्रमाण आहे.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २४ च्या आधारे :-

सूक्ष्म अध्यापनाचे पाठ घेत असताना कोणत्या अडचणी आल्या? त्या कशा दूर केल्या?

या संबंधीच्या माहितीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असे आढळून आले की, ४ प्रतिसादकांनी नकारात्मक प्रतिसाद दिला तर १५ प्रतिसादकांनी होकारात्मक प्रतिसाद दिला यात विद्यार्थी नविन असल्यामुळे भिती, कुतूहल, दडपण इत्यादी बाबी दिसून येतात, कौशल्य प्राप्ती होण्यास वेळ लागतो अशा प्रकारच्या अडचणी येतात असा प्रतिसाद दिला आहे. या अडचणी दूर करण्यासाठी नविन प्रशिक्षणार्थींना सराव करण्यास सांगून, सरावाने त्यांच्यात सुधारणा घडवून आणल्या जातात असा प्रतिसाद दिला आहे.

* प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २५ व २६ च्या आधारे :-

प्रश्नावलीतील :-

मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्याच्या दृष्टीने कार्यक्रम घेतले जातात काय? कोणकोणते सहशालेय कार्यक्रम घेतले जातात?

या संबंधीच्या माहितीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता असे दिसून आले की, या बाबत १००% प्रतिसाद होकारात्मक मिळालेला आहे. सहशालेय कार्यक्रमा बाबतच्या तपशीलास १००% प्रतिसाद मिळाला आहे त्यात श्रमसंस्कार शिबीर, समाज सेवा काल शिबीर, जयंत्या, पुण्यतिथ्या, व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी कार्यक्रम घेतले जातात. असा प्रतिसाद मिळालेला आहे.

** प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २७ व २८ च्या आधारे :-

शिबिराचे आयोजन केले जाते काय? किती दिवसाचे?

या संबंधीच्या माहितीच्या तपशीलाचा अभ्यासकाने अभ्यास केला असता २४ प्रतिसादकांनी म्हणजे १००% प्रतिसादकांनी होकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यात सात दिवसाचे शिबीर घेतले जाते असा प्रतिसाद १६ प्रतिसादकांनी दिला तर. ३ प्रतिसादकांनी १० दिवसाचे शिबीर घेतले जाते असा प्रतिसाद मिळाला आहे.

## ६.४ मुलाखती द्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन -

अभ्यासकाने एकूण २५ व्यक्तींच्या वैयक्तिक मुलाखती घेतलेल्या आहेत. त्यामध्ये -

| | | |
|---|---|---|
| १] प्राचार्य | - | ०१ |
| २] प्राध्यापक | - | ०४ |
| ३] प्रशिक्षणार्थी | - | २० |
| एकूण. | | २५ |

या मुलाखती घेतलेल्या प्रतिसादकांची यादी परिशिष्ट क्रमांक ३ रे [१,२, ] मध्ये दिलेली आहे. त्यामध्ये प्रतिसादकांचे नांव, अध्यापक विद्यालयाचा पत्ता, हुद्दा दिलेला आहे.

### १] ** प्राचार्य मुलाखती -

अभ्यासकाने एका प्राचार्यांची मुलाखत घेतली आहे. त्यांच्या मुलाखतीचे प्रश्न मुलाखती अनुसूची परिशिष्ट क्रमांक ३[१] मध्ये दिलेली आहे.

प्रथम प्राचार्यांना मुलाखत घेताना मुलाखत प्रश्नावली दिल्यानंतर एक एक प्रश्न विचारून माहिती जाणून घेतली अध्यापक विद्यालयाचे नांव, अध्यापन अनुभव, प्राध्यापकांची संख्या, प्राध्यापकांच्या वेतना विषयीची माहिती, संस्थाचालकांच्या सहकार्या बद्दलची माहिती अध्यापक विद्यालयाच्या इमारती विषयी, ग्रंथालयातील संदर्भ पुस्तकां विषयी, खेळाच्या मैदाना विषयी, सूक्ष्म अध्यापन, सराव पाठविषयीची माहिती, सांस्कृतिक कार्यक्रमां विषयीची

माहिती, प्रशासकीय कर्तव्य पार पाडताना येणाऱ्या अडचणी विषयी, सहकारी प्राध्यापकांच्या सहकार्या विषयीची माहिती मिळविली आहे.

सदर मुलाखत घेतली असता जवळजवळ ९९ टक्के प्रश्नांची उत्तरे ही होकारात्मक म्हणजेच सकारात्मकच मिळाली आहेत. प्रतिसादक प्राचार्यांनी प्रशासकीय कर्तव्य पार पाडत असताना संस्थाचालकांचे सहकार्य मिळते त्याच बरोबर मार्गदर्शन लाभते त्यामुळे विशेष अशा प्रशासकीय अडचणी येत नाहीत असे सांगितले अध्यापक विद्यालयाची इमारत ही संस्थेच्या मालकीची आहे. अध्यापक विद्यालयास खेळाचे मैदान आहे, ग्रंथालय आहे. त्याच प्रमाणे अध्यापन करण्यासाठी सर्व अध्यापन पद्धतीसाठी स्वतंत्र प्राध्यापक वृंद आहे. त्यांचेही सहकार्य चांगले लाभते.

एकंदरीत विचार करता या मुलाखती वरुन असे आढळून आले की, सदर प्रतिसादक प्राचार्यांना विशेष अशा प्रशासकीय समस्या येत नाही कारण त्यांना संस्थाचालकांचे पुरेपुर सहकार्य मिळते. तसेच सहकारी प्राध्यापकांचे ही सहकार्य मिळते. अध्यापक विद्यालयास शासकीय नियमानुसार मनुष्यबळ आणि भौतिक साधन सामग्री अध्यापक विद्यालयात उपलब्ध असल्यामुळे प्रशासकीय समस्यांना तोंड दयावे लागत नाही. अलीकडे जिल्हा परिषद नियमानुसार केंद्रीय पद्धतीने प्रवेश देण्यात येत असल्यामुळे प्रवेश संबंधी अडचणी येत नाहीत.

[२] प्राध्यापक मुलाखती -

अभ्यासकाने एकूण ०४ प्रतिसादक प्राध्यापकांच्या वैयक्तिक मुलाखती घेतल्या आहेत. त्यांच्या मुलाखतीचे प्रश्न मुलाखती अनुसूची परिशिष्ट क्रमांक 3 [२] मध्ये दिलेले आहेत.

या प्राध्यापकांच्या मुलाखती घेताना मुलाखत प्रश्नावली अभ्यासण्यासाठी आगोदर देण्यात आली व नंतर विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रशासनाची, प्रशिक्षणाची, भौतिक साधन सामग्रीची स्थिती विचारली असता यातील दोन प्रतिसादक प्राध्यापक अत्यंत उदासीन आहेत असे दिसून आले तर दोन प्राध्यापक प्रशासन, प्रशिक्षण भौतिक साधन सामग्री या विषयी समाधानी असल्याचे दिसून आले.

मुलाखत प्रश्नावलीत आगोदर संशोधन विषयाचे शीर्षक देण्यात आले आहे. नंतर प्रतिसादक प्राध्यापकाचे संपूर्ण नाव, पत्ता विचारला आहे. कोणत्या अध्यापक विद्यालयात नोकरीस आहात? यामध्ये प्रतिसादकांनी ते अध्यापन कार्य करत असलेल्या अध्यापक विद्यालयाचे नांव, गावाचे नाव दिलेले आहे. यानंतर मुलाखत प्रश्नावलीत प्राध्यापकांच्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हते नुसार माहितीचा तपशील याची माहिती विचारली त्याचा तपशील कोष्टक क्रमांक ६.१० मध्ये दिलेला आहे.

कोष्टक क्रमांक ६.१०

| अ.नं. | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता | प्रतिसादक प्राध्यापकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१] | एम.ए.बी.एड्. | ०२ | ५० |
| ०२] | बी.ए.बी.एड्. | ०१ | २५ |
| ०३] | एम.कॉम. बी.एड्. | ०१ | २५ |
| | | ०४ | १०० |

वरील कोष्टक क्रमांक ६.१० वरून असे आढळते की, दोन प्राध्यापक हे एम.ए.बी.एड्. आहेत त्यांचे शेकडा प्रमाण ५० टक्के आहे. तर एम.कॉम.बी.एड्. आणि बी.ए.बी.एड्. प्राध्यापक प्रत्येकी एक आहेत त्यांचे शेकडा प्रमाण २५ टक्के आहे.

पुढे कोष्टक ६.११ मध्ये मुलाखती घेतलेल्या प्रतिसादकांच्या अध्यापनाचा अनुभव व त्यांचे वर्गीकरण केले आहे.

** कोष्टक क्रमांक ६.११ =

// मुलाखती घेतलेल्या प्राध्यापकांच्या अध्यापन अनुभवा [वर्षे] नुसार केलेले वर्गीकरण //

| अ.नं. | अध्यापनाचा अनुभव | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१] | ०० ते ०५ वर्षे | ०२ | ५० टक्के |
| ०२] | ०६ ते १० वर्षे | ०१ | २५ टक्के |
| ०३] | ११ ते १५ वर्षे | ०१ | २५ टक्के |
| | एकूण | ०४ | १०० टक्के |

वरील कोष्टक क्रमांक ६.११ वरून असे आढळून आले की ०० ते ५ वर्षे अध्यापन अनुभव असणारे २ प्राध्यापक आहेत त्यांचे शेकडा प्रमाण ५० टक्के आहे. ६ ते १० वर्षे आणि ११ ते १५ वर्षे अध्यापन अनुभव असणारे प्रत्येकी एक प्राध्यापक असून त्यांचे शेकडा प्रमाण २५ टक्के आहे.

वरील सर्व प्राध्यापक हे शैक्षणिक आणि व्यावसायिक अर्हते नुसार प्रशिक्षित आहेत. त्याच प्रमाणे त्यांचा कामाचा अनुभव ही

यागला आहे.

प्राध्यापकांच्या सहकार्य, नियमानुसार मासिक वेतन, ग्रंथालय, खेळाचे मैदान, भौतिक साधन सामुग्री, प्रशिक्षणार्थी-कडून प्रात्यक्षिक कार्य करुन घेता का? शासकीय नियमानुसार शैक्षणिक कार्यक्रम राबविले जातात का? अभ्यासेत्तर कार्यक्रम राबविले जातात का? शैक्षणिक कर्तव्य पार पाडत असताना संस्थाचालक हस्तक्षेप करतात का?

इत्यादी प्रश्नांविषयी मुलाखत घेत असताना विचारणा केली असता सर्व प्रतिसादक प्राध्यापकांनी होकारात्मक उत्तरे दिलेली आहेत. यावरुन असे दिसून येते की, प्रतिसादकांना त्यांचे शैक्षणिक कर्तव्य पार पाडत असताना कोणत्याही अडचणी येत नाहीत. निवडलेल्या सर्व प्रतिसादक प्राध्यापकांनी मुलाखतीत १०० टक्के प्रतिसाद दिलेला आहे.

* ०३] अभ्यासकाने एकूण २० प्रशिक्षणार्थींच्या वैयक्तीक मुलाखाती घेतलेल्या आहेत या २० प्रशिक्षणार्थींनी घेतलेल्या मुलाखतीची अनुसूची परिशिष्ट क्रमांक ३ [३] मध्ये दिलेली आहे.

प्रथम प्रशिक्षणार्थींना मुलाखतीची रुपरेषा प्रश्नावली द्वारे माहिती व्हावी यासाठी प्रश्नावली देण्यात आली. यामध्ये प्रशिक्षणार्थींची वैयक्तीक माहिती, अध्यापक विद्यालयातील भौतिक साधन सामुग्री तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विषयीची माहिती जाणून घेतली.

यामध्ये अध्यापक विद्यालयाचे नाव, गावाचे नाव विचारले असता १०० टक्के प्रतिसादकांनी प्रतिसाद दिला. वेगवेगळ्या वर्गी घेतलेल्या अध्यापन पध्दती विषयी १०० टक्के प्रतिसाद मिळाला. अध्यापक विद्यालयात असणाऱ्या स्वतंत्र विश्रांतीकक्षा विषयी ५० टक्के प्रतिसादकांनी होकारात्मक प्रतिसाद दिला तर २५टक्के प्रतिसादकांनी नकारात्मक तर २०टक्के प्रतिसादकांनी प्रतिसाद दिला नाही.

वर्गातील प्रकाशयोजने विषयी १०० टक्के सकारात्मक प्रतिसाद मिळाला. क्रिडांगणा विषयी आणि खेळाच्या साहित्या विषयी ७५ टक्के प्रतिसाद होकारात्मक आणि २५ टक्के प्रतिसाद नकारात्मक मिळाला. ग्रंथालय आणि संदर्भ पुस्तके या विषयी ४५टक्के प्रतिसाद होकारात्मक १५ टक्के प्रतिसाद काही प्रमाणात आणि ४० टक्के प्रतिसाद नकारात्मक मिळाला. सराव पाठा विषयी प्राध्यापक सहकार्य आणि मार्गदर्शन या विषयी १००टक्के प्रतिसाद सकारात्मक मिळाला.

अध्यापक विद्यालयात सहशालेय उपक्रम राबविले जातात या विषयी ६५ टक्के प्रतिसाद सकारात्मक मिळाला. यामध्ये जयंत्या, पुण्यतिथ्या, तसेच वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात असी माहिती मिळाली तर ३५ टक्के प्रतिसाद नकारात्मक मिळाला.

एकंदरीत विचार करता प्रशिक्षणार्थींच्या मुलाखती वरुन असे दिसून येते की, अध्यापक विद्यालयात विश्राम कक्ष, ग्रंथालय, खेळाचे मैदान इत्यादी बाबी या प्रशिक्षणार्थींना पुरेसे मिळत नाही. यातूनच विनाअनुदानित अध्यापक विद्यालयात मिळणाऱ्या तुटपुंज्या शैक्षणिक सोयीतुन प्रशिक्षण मिळते आहेत यातच प्रशिक्षणार्थी समाधान मानत आहे. असे दिसते.

————x————